RNI No. MAHBIL /2009/35827

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

**वर्ष ९, अंक ७] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी १६-२२, २०२३/माघ २७-फाल्गुन ३, शके १९४४ [पृष्ठे ११ , किंमत : रुपये १५.००**

### प्राधिकृत प्रकाशन

**संकीर्ण सूचना व जाहिराती**

### बृहन्मुंबई महानगरपालिका

**जाहीर सूचना**

क्रमांक उप्र.अभि./इ.प्र-दोन/४२७७/पी आणि आर

अद्ययावत मुंबई महानगरपालिकेच्या कायदा, १८८८, (आजतागायत सुधारित) च्या कलम २९७(१)(ब) च्या तरतुदीनुसार जाहीर सूचना देण्यात येत आहे की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी/उत्तर विभागातील, स्कुल लेनने बाधित न.भू.क्र. २८७, २९९, ३००, ३०१, ३०२अ व ३०२ब मौजे मालाड पूर्व (अं.भू.क्र. ६१, ६२, ६३, ६४, ६५, ६६ आणि ६७ नगररचना मालाड क्र. १), मालाड (पूर्व) या रस्त्यास, ९.१५ मी. रुंद प्रस्तावित नियमित रेषा विहित करण्यात येत आहे.

नगररचना योजनेतील विद्यमान रस्ता व त्याच्या प्रतियोजनेतील ९.१५ मी. रुंद प्रस्तावित नियमित रेषा, मा. महानगरपालिका आयुक्त यांनी मंजुरी क्र. एम.सी.पी./२५३/दिनांक २८ सप्टेंबर २०२२ अन्वये तत्त्वतः मंजूर केलेली आहे. सदर नकाशा क्र. स.अ./सर्वेक्षण/प.उ.-२/३७/२०२२, सहायक अभियंता (सर्वेक्षण) पी व आर, उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) प.उ.-२ यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत पाहणीकरिता खुला ठेवण्यात आलेला असून, सदर कार्यालयाचा पत्ता : उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) प.उ.-२, म्युनिसिपल गोडाऊन, पहिला मजला, संस्कृती कॉम्प्लेक्स, सी विंग, ९० फूट, डी.पी. रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई ४०० १०१ आहे. तसेच सहायक आयुक्तांचे कार्यालय पी/उत्तर वार्ड, पहिला मजला, लिबर्टी गार्डन, मामलेतदारवाडी मुख्य रस्ता, मालाड (पश्चिम), मुंबई ४०० ०६४ या ठिकाणीही कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सदर नकाशा पाहणीकरिता उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सदर सूचनेच्या अधिकृत **शासकीय राजपत्रात** व स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत सदर ९.१५ मी. रुंद प्रस्तावित नियमित रेषेवर जनतेकडून सूचना/हरकती आता मागवित आहोत. सदर सूचना/हरकतीवर खाली सही करणारे सुनावणी देतील आणि सदर प्रस्तावित नियमित रेषेस अंतिम स्वरूप देताना व स्थापत्य समिती व महानगरपालिकेची अंतिम मंजुरी मागताना सदर सूचना/हरकतींचा विचार करण्यात येईल.

सदर सूचना/हरकती लिखित स्वरूपात उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव ) पश्चिम उपनगरे/२ आणि सहायक आयुक्त (पी/उत्तर) विभाग यांच्या नावे उपरोक्त वैधानिक ३० दिवसांच्या कालावधीत त्यांच्या उपरोक्त नमूद केलेल्या पत्त्यावर कळवाव्यात. उपरोक्त तारखेच्या आधी आणि नंतर दिलेल्या सूचना आणि/वा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. "नगररचना योजना रस्त्याच्या प्रस्तावित नियमित रेषेसंबधी सूचना/हरकती" असे ठळक अक्षरांमध्ये लिहिलेल्या बंद लिफाफ्यामध्ये सूचना/हरकती कळवाव्यात.

मुंबई,
दिनांक १४ नोव्हेंबर २०२२.

**सी. डी. चौधरी,**
उप्र अभि. (इमारत प्रस्ताव) प. उ.-२.

PRO/2466/ADV/2022-23

## BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION

### Public Notice

No. Dy.CHE/B.P./WS-II/4277/P&R of

Is hereby given pursuant to section 297(*1*)(*b*) of the Mumbai Municipal Corporation Act, 1888 as modified up to date, that the 9.15 Mt. wide proposed regular line to the existing Town Planning road known as School Lane affecting the land bearing CTS No. 287, 299, 300, 301, 302A and 302B of Village Malad East (F.P. No. 61, 62, 63, 64, 65, 66 and 67 of TPS Malad No. I) at Malad (East), Mumbai in P/North ward to have adequate access to various plots.

As per in principle approval by the Hon'ble Municipal Commissioner u/no. MCP/253/Dated 28th September 2022, copy of plan u/no. A.E.(Survey)/WS-II/37/2022 showing the existing Town Planning Road and the fresh line proposed to be prescribed in substitution thereof as aforesaid is kept open for inspection during office hours on any working days in the office of Dy.Ch.E.(B.P.)WS-II, whose office is situated at 1st Floor, C-Wing, Sanskruti Complex, 90 Feet Road, Thakur Complex, Kandivali (East),Mumbai- 400 101 and also available for inspection in the office of the Assistant Commissioner (P/North) ward, P/North Ward Office Building, Liberty Garden, Mamletdarwadi Main Road, Malad (West), Mumbai - 400 064.

The suggestions and/or objections are now invited from the public in respect of the said 9.15 Mt. wide proposed regular line within 30 (Thirty) days from the date of publication of this notice in the *official Government Gazette* and local Newspapers and same would be heard by the undersigned and would be considered while finalizing and submitting the said proposal of R.L. to Works Committee and Corporation.

The suggestions and/or objections may be communicated in writing to the Dy.Ch.E.(B.P.)W.S.II and or Assistant Commissioner (P/North) ward within above said statutory notice period of 30 days at their office at above mentioned address. The suggestions and/or objections received before and after the aforesaid date will not be considered. The envelopes forwarding the suggestions/objections may be superscribed in bold letters "Suggestions/Objections to the proposed R.L. of T.P. Road".

Mumbai,
Dated 14th November 2022.
PRO/2466/ADV/2022-23.

C. D. CHAUDHARI,
Dy. Ch. E.(B.P.)W.S.II.

## गुहागर नगरपंचायत, गुहागर

## सूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१)
अन्वये गुहागर शहराच्या प्रारूप विकास योजनेचे प्रसिद्धीकरण.**

क्र.८०३.— ज्याअर्थी, गुहागर नगरपंचायतीने (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे निर्देशिलेले), तिच्या अधिपत्याखाली क्षेत्राची (यापुढे "उक्त क्षेत्र" असे उल्लेखिलेली), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे निर्देशिलेली), चे कलम २१ (२) चे अनुषंगाने कलम २३ (१) मधील तरतुदीनुसार प्रारूप विकास योजना, गुहागर (यापुढे "उक्त प्रारूप विकास योजना" असे उल्लेखिलेली), तयार करण्याचा इरादा ठराव क्र.२८ दिनांक १६ फेब्रुवारी २०२१ अन्वये जाहीर करून त्याबाबतची सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्र**, दिनांक ०४-१० मार्च २०२१ रोजी प्रसिद्ध केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरून गुहागर नगरपंचायतीने उक्त क्षेत्रातील उक्त प्रारूप विकास योजना तयार करण्यासाठी सहायक संचालक नगररचना, शाखा रत्नागिरी यांची "नगररचना अधिकारी" म्हणून आदेश क्र.११४५/२०२०-२०२१ दिनांक २६ मार्च २०२१ अन्वये नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नियम प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २६ (१) अन्वये उक्त प्रारूप विकास योजना जनतेकडून सूचना / हरकती मागविण्याकरिता प्रसिद्ध करण्यासाठी ठराव क्र. २६ दिनांक ८ फेब्रुवारी २०२३ रोजी पारित केला आहे.

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त प्रारूप विकास योजना, विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाच्या कलम २६ (१) अन्वये नागरिकांकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करीत आहेत. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ, खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

१. मुख्याधिकारी, गुहागर नगरपंचायत, गुहागर.

२. सहायक संचालक, नगररचना, शाखा रत्नागिरी.

उक्त प्रारूप योजनेतील तरतुदी संबंधी नागरिकांच्या काही सूचना / हरकती असतील तर त्यांनी ही सूचना **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मुख्याधिकारी, गुहागर नगरपंचायत, गुहागर यांचेकडे लेखी स्वरूपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत नगरपंचायतीकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जातील.

उक्त प्रारूप विकास योजनेचे नकाशे व तपशिलाच्या प्रती योग्य शुल्क आकारून गुहागर नगरपंचायतीच्या कार्यालयात नागरिकांना उपलब्ध होऊ शकतील.

गुहागर,
दिनांक ९ फेब्रुवारी २०२३.

**प्रसाद शिंगटे,**
मुख्याधिकारी,
गुहागर नगरपंचायत, गुहागर.

## GUHAGAR NAGAR PANCHAYAT, GUHAGAR

### Notice

### Publication of Draft Development Plan of Guhagar Under Section 26(1) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966

No.803.—Whereas the Guhagar Nagar Panchayat, (hereinafter referred to as "the said Planning Authority") *vide* Resolution No. 28 dated 16th February 2021 had declared its intention to prepare a Draft Development Plan of Guhagar (hereinafter referred to as the "said Draft Development Plan") for the area under its jurisdiction,(hereinafter referred to as the said "area" ) as per the provision of section 23(*1*) read with section 21(*2*) of Maharashtra Regional & Town Planning Act,1966 ( hereinafter referred to as the "said Act" ) and notice to that effect is published in *Maharashtra Government Gazette* 04-10 March 2021.

And whereas, as per the provision in section 24 of the said Act, the Nagar Panchayat *vide* Order no. 1145/20-21 dated 26th March 2021 has appointed Assistant Director, Town Planning. Branch Ratnagiri as "Town Planning officer" to prepare the said Draft Development Plan for the said area;

And whereas, the Town Planning Officer and Assistant Director, Town Planning Branch Ratnagiri after having prepared Existing Land Use Map as per section 25 of the said Act, has prepared the said Draft Development Plan of the said area and has handed it over to the said Planning Authority on dt 03rd February 2023 for publication under section 26(1) of said Act;

And whereas, the said Planning Authority has passed Resolution No. 26, dated 08th February 2023 to publish the said Draft Development Plan under section 26(1) of the said Act, for inviting suggestions/objections from the public;

Therefore, Guhagar Nagar Panchayat hereby publishes the said Draft Development Plan along with the Report under section 26(1) of the said Act for inviting suggestions/objections from the public. The copy of the said Draft Development Plan and Report there of are kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours.

1. The Chief Officer Guhagar Nagar Panchayat, Guhagar
2. Assistant Director, Town Planning, Branch Ratnagiri

The suggestions/objections if any, in writing from the public in this regard with reasons, shall be submitted to the Chief Officer Guhagar Nagar Panchayat, within the period of 30 days from the date of publication of the Notice in *Maharashtra Govt. Gazette.* Suggestions/objections received by the Nagar Panchayat within the period of the 30 days from the date of publication of this Notice in *Maharashtra Government Gazette* shall only be considered.

The copies of the said Draft Development Plan and particulars shall be available to the public at reasonable price in the office of the Guhagar Nagar Panchayat.

Guhagar,
Dated 9th February 2023.

PRASAD SHINGATE,
Chief Officer,
Guhagar Nagar Panchayat, Guhagar.

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर विभाग, सोलापूर**

**नाथ प्राईड १ला मजला, सिव्हिल हॉस्पिटलच्या पुर्वेस, उ. सदर बझार, सोलापूर.**

**चौकशीची जाहीर नोटीस**

क्र. ३१८/२०२३

**योजना अर्ज क्रमांक** : ८७६/२०२१, कलम ५०(अ) (२)

**सार्वजनिक न्यासाचे नाव :**

१. **श्री. बनशंकरी (चौडेश्वरी) देवी देवस्थान,**
४९८, साखर पेठ, सोलापूर तर्फे विश्वस्त,
**श्री. नितीन नागेश गुम्मा,** रा. १२१, सोमवार पेठ, सोलापूर.

२. **विठोबा सिद्रामप्पा गंजी ट्रस्ट, सोलापूर**
साखर पेठ, सोलापूर तर्फे विश्वस्त,
**श्री. शशिकांत सदाशिव यरगल,** रा. ३०, साखर पेठ, सोलापूर,

} **अर्जदार**

मा. धर्मादाय उप आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर हे वर नमूद केलेल्या न्यासासंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५०(अ)(२) अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१. **श्री. बनशंकरी (चौडेश्वरी) देवी देवस्थान, ४९८, साखर पेठ, सोलापूर**
या न्यासाचे सामिलीकरण (विलीनीकरण) करणे.

२. **विठोबा सिद्रामप्पा गंजी ट्रस्ट, साखर पेठ, सोलापूर**
या न्यासाची मिळकत या न्यासाकडे वर्ग झालेली आहे असे ठरविणे.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस (३०) दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत/ हरकत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही, असे समजून चौकशी पुरी केली जाईल आणि वर नमूद केलेल्या दोन्ही न्यासाचं एकत्रीकरण (विलीनीकरण) याबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही जाहीर नोटीस मा. धर्मादाय उप आयुक्त, सोलापूर यांचे आदेशानुसार व माझे सहीनिशी आणि कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक ६ जून २०२२ रोजी दिली.

**एस. एस. कुमठेकर,**
अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सोलापूर विभाग, सोलापूर.

(**टीप** : सदरील नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्याचा खर्च न्यासाच्या संबंधित अर्जदारावरती राहील.)

**मिरा-भाईंदर महानगरपालिका, मिरा-भाईंदर**

क्रमांक मिभा/मनपा/आस्था/२३५३/२०२२-२३

मिरा-भाईंदर महानगरपालिका सुधारित सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ मध्ये, मुख्य विधी अधिकारी (वर्ग-१) व सहायक विधी अधिकारी (वर्ग-३) पदांच्या सेवाप्रवेशासाठी विहित केलेल्या अर्हता व नेमणूकीच्या पध्दतीस मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
**शासन निर्णय क्रमांक:- मिभाम-११२२/सं.क्र.२५३/प्र. क्र. ७०/नवि-२८**
४ था मजला, मंत्रालय (मुख्य इमारत),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- ०२ फेब्रुवारी, २०२३.

संदर्भ:-१) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.-मिभाम-१११६/प्र.क्र.३५/१६/नवि-२८, दि.२८.०५.२०१९.

२) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे पत्र क्र. मिभा/ मनपा/ आस्था/ ३३०२/ २०२१-२२, दि. ०४.०२.२०२२.

३) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे पत्र क्र. मनपा/आस्था/७५२/२०२२-२३, दि.०४.०७.२०२२.

४) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे पत्र क्र. मिभा/ मनपा/ आस्था/ १५८५/२०२२-२३, दि.१७.११.२०२२.

५) मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचा प्रशासकीय ठराव क्र. ११२, दि.१४.११.२०२२.

प्रस्तावना:-

मिरा-भाईंदर महानगरपालिका सुधारित सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ ला दि.२८.०५.२०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. महानगरपालिकेच्या सदर आकृतीबंधात विधी विभागासाठी 'मुख्य विधी अधिकारी' (वर्ग-१) व 'सहायक विधी अधिकारी' (वर्ग-३) ही पदे मंजूर करण्यात आली नव्हती. तसेच, 'मुख्य विधी

अधिकारी' (वर्ग-१) या पदासाठी सेवा प्रवेश नियमात नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती नमूद करण्यात आलेल्या नव्हत्या. तर त्यापूर्वी आकृतीबंधात 'विधी अधिकारी' (वर्ग-२) हे पद मंजूर असल्याने, या पदासाठी व 'सहायक विधी अधिकारी' (वर्ग-३) या पदांसाठी सेवा प्रवेश नियमामध्ये, नेमणूकीच्या पध्दती, अर्हता व शैक्षणिक पात्रता नमूद करण्यात आल्या होत्या.

२. मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील विधी विभागातील वाढते कामकाज, प्रलंबित दावे/प्रकरणे या बाबी विचारात घेता, मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर, आता, 'मुख्य विधी अधिकारी' (वर्ग-१) १ पद व 'सहायक विधी अधिकारी' (वर्ग-३), २ पदे अशी एकूण ३ पदे नव्याने निर्माण करण्यास' दि. ०२.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात आलेली आहे. त्यासाठी आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी संदर्भीय दि.०४.०२.२०२२ व दि.०४.०७.२०२२ च्या पत्रान्वये, मिरा-भाईंदर महानगरपालिका सुधारित सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ मध्ये, 'मुख्य विधी अधिकारी' व 'सहायक विधी अधिकारी' या पदांसाठी सेवाप्रवेश पध्दती व अर्हतांचे समावेशन करण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे. त्यानुसार सदर पदांसाठी नेमणूकीच्या अर्हता व पध्दती विहीत करून, त्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>:-**

आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी संदर्भीय दि.०४.०२.२०२२ व दि.०४.०७.२०२२ च्या पत्रान्वये, मिरा-भाईंदर महानगरपालिका सुधारित सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ या सेवा प्रवेश नियमात, 'मुख्य विधी अधिकारी' व 'सहायक विधी अधिकारी' या पदांसाठी सेवाप्रवेश पध्दती व अर्हतांचे समावेशन करण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावास, परिशिष्ट-अ, अनुसूची-'ड' नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-१९४९ च्या, कलम-४५४, ४५५, ४५६, ४५७(अ) व ४६५ अन्वये, शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर नियमांस "मिरा-भाईंदर महानगरपालिका सुधारित सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१९ चा सुधारित भाग संबोधण्यात यावे.

३. सदर सुधारित नियम आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी तात्काळ शासन राजपत्रात प्रसिध्द करावेत. हे नियम शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

शासन निर्णय क्रमांकः **मिभाम-१९२२/सं.क्र.२५३/प्र. क्र. ७०/नवि-२८**

४. या अनुषंगीक सर्व सांविधानिक बाबींची पूर्तता आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी करावयाची आहे.

५. www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२३०२०२१९०४०८७६२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATIBHA MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=b693d975fffc642fe6b87c2ce9e1297fd1e8bda9b459f85f75f159984ba680fd, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECBBF2F6D6CB0AE6ED5C1E544834901I9EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2023.02.02 19:09:51 +05'30'

**( प्रतिभा पाटील )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
३) जिल्हाधिकारी, ठाणे.
४) आयुक्त तथा प्रशासक, मिरा-भाईंदर महानगरपालिका, जिल्हा ठाणे.
५) प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) उप सचिव (नवि-२८), यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवडनस्ती ( नवि-

शासन निर्णय क्रमांकः **मिभाम-११२२/सं.क्र.२५३/प्र. क्र. ७०/नवि-२८**

शासन निर्णय क्र.मिभाम-११२२/ सं.क्र. २५३/प्र.क्र.७०/नवि-२८, दि. ०२ फेब्रुवारी, २०२३ सोबतचे

**परिशिष्ट-२, अनुसूची-'ड'**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५ व ५३ (१) मधील तरतूदीनुसार नेमणूक करावयाच्या पदांसाठीची कलम-४५(३) व कलम-४५७(३) अन्वये विहित शैक्षणिक व इतर अर्हता व नेमणूकीच्या पध्दत.**
**(पहा नियम-३)**

| अ.क्र. | पदनाम व श्रेणी | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी/नामनिर्देशन | नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| १. | मुख्य विधी अधिकारी (श्रेणी-१, विधी सेवा) | पदोन्नती-१००% | महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विधी अधिकारी या पदावर किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व मान्यता प्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी धारण केलेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| | | प्रतिनियुक्ती | पदोन्नतीने पद उपलब्ध न झाल्यास, सदर पद उपलब्ध होईपर्यंत, राज्य शासनाकडील समकक्ष विधी अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| २. | सहायक विधी अधिकारी (श्रेणी-३, विधी सेवा) | नामनिर्देशन/सरळसेवा-१००% | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी.<br>ब) उच्च न्यायालय किंवा त्यांचे अधिपत्याखालील इतर न्यायालयांमध्ये किमान ०५ वर्षे अधिवक्ता/वकील म्हणून किंवा शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेमधील संबंधित कामाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण.<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

********

मिरा-भाईंदर,
दिनांक १० फेब्रुवारी २०२३.

**दिलीप ढोले,**
आयुक्त,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

## सक्षम प्राधिकारी - ८, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

क्रमांक झोपुप्रा/स.प्रा.८/ग.व.घो./कैलास स.गृ.नि.सं./२०२३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ अनुसार मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ, बृहन्मुंबई यांचे मालकीचे जमिनी व्यतिरिक्त या कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील इतर सर्व जमिनीवरील भोगवटादाराचे हितसंबंधाचे संरक्षण करणेकरिता सक्षम प्राधिकारी - ८, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई म्हणून नियुक्ती करणेत आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, खाली नमूद अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र हे अपुऱ्या सोयीमुळे किंवा कोणत्याही मूलभूत सोयी नसल्यामुळे किंवा अनारोग्यकारी, गलिच्छ, दाटीवाटीचे असल्यामुळे किंवा अन्य कारणामुळे ते क्षेत्र किंवा आसपासच्या जनतेच्या आरोग्याचे सुरक्षितेस किंवा सुखसोयीस अपायकारक झाले आहे किंवा अपायकारक ठरण्याचा संभवआहे, अशी सक्षम प्राधिकरणाची खात्री पटली आहे.

त्याअर्थी, मी, शिवाजी दावभट, सक्षम प्राधिकारी-८, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई उक्त अधिनियमान्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून खालील अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र उक्त अधिनियमाचे कलम ४(१) नुसार गलिच्छ वस्ती म्हणून घोषित करीत आहे :—

### अनुसूची

**झोपडपट्टीचे स्थानिक नाव : मारूती चाळ, क्वारी रोड, भांडूप (प.), मौजे-कांजूर, ता. कुर्ला**

| न.भू.क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|
| ३६०,३६०/१ते११ | ८६०.७० |
| **एकूण** | **८६०.७०** |

न.भू.क्र.३६०, ३६०/१ ते ११
झोपडपट्टी गलिच्छ वस्ती क्षेत्राची चतुःसीमा :—
**पूर्व** : लागू न.भू.क्र. ३५९
**पश्चिम** : लागू न.भू.क्र. ३६२
**उत्तर** : क्वारी रोड
**दक्षिण** : लागू न.भू.क्र. ३५८

**सक्षम प्राधिकारी - ८ यांचे कार्यालय,**
नवीन प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग,
‘ए’ विंग, २ रा मजला, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
वांद्रे (पुर्व) मुंबई ४०० ०५१,
दिनांक १३ फेब्रुवारी २०२३.

**शिवाजी दावभट,**
सक्षम प्राधिकारी - ८,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.

## BY THE COMPETENT AUTHORITY - 8, SLUM REHABILITATION AUTHORITY, MUMBAI

No. SRA/CA-8/Slum Declaration/Kailas CHS/2023.—Whereas the Competent Authority - 8, SRA, Mumbai has been appointed as, under section 3 of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance, Redevelopment) Act, 1971 in respect of all lands having any type of tenure and ownership (except Central Government Lands) in Mulund, Bhandup, Kanjur, Hariyali, Vikroli and Ghatkopar revenue villages within Kurla Taluka ;

And Whereas on the basis of the information about the slum areas available, the Competent Authority is satisfied that areas specified in the Schedule hereto (hereinafter referred to as the said areas) are source of danger to the health, safety or convenience of the public of that area and of its neighbourhood by reason of it being overcrowded and lacking in basic amenities, has been rendered insanitary, squalid, and/or otherwise.

Now, therefore, in exercise of the powers conferred on me under section 4(1) of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance, Redevelopment) Act, 1971, I, Competent Authority-8, SRA, Mumbai, declare the said areas to be the Slum Areas.

**Schedule of Areas**

**Local name of the area and village-Maruti Chawl, Quarry Road, Bhandup (W.), Village Kanjur, Taluka Kurla**

| C.T.S. No. | Area (Sq.Mt.) |
|---|---|
| 360, 360/1 to 11 | 860.70 |
| **Total** | **860.70** |

C.T.S. No. 360,360/1 to 11

Description of Boundaries :—
*East* : CTS No. 359
*West* : CTS No. 362
*South* : CTS No. 358
*North* : CTS No. Quarry Road

**SHIVAJI DAVBHAT,**
Competent Authority - 8,
Slum Rehabilitation Authority, Mumbai.

**Office of the**

**Competent Authority-8,**
Slum Rehabilitation Authority, Mumbai
New Administrative, Building,
Anant Kanekar Marg, A wing, 2nd Floor,
Slum Rehabilitation Authority, Bandra (E.).
Mumbai 400 051,
Dated 13th February 2023.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.